वारी मार्गातील ठिकाणे स्वच्छ ठेवा

जिल्हा परिषदेत नियोजन बैठकीत संगमनेरे यांचे निर्देष

नाशिक । प्रतिनिधी

संत निवृत्तिनाथ महाराज आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद नाशिकच्या वतीने सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी नियोजन बैठक घेण्यात आली.

यावेळी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिभा संगमनेरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपक पाटील, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी दीपक लोणे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे सहायक कार्यकारी अभियंता अजित सूर्यवंशी उपस्थित होते.

वारी दरम्यान हजारो वारकरी उपस्थित असतात. या अनुषंगाने शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि आरोग्य यंत्रणा सक्षम ठेवण्याचे निर्देश बैठकीत प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संगमनेरे यांनी दिले. यात्रेकरूंना पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी जिल्हा पाणीपुरवठा विभागाला आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच, पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने वारी मार्गावरील ठिकाणी स्वच्छ व कार्यरत शौचालयांची व्यवस्था सुनिश्चित करण्याच्या सूचना देखील यावेळी त्यांनी दिल्या.

वारीच्या काळात विविध साथीचे रोग, विशेषतः पाणीजन्य व हवेच्या माध्यमातून पसरणाऱ्या आजारांची शक्यता लक्षात घेता, आरोग्य विभागाच्या पथकांनी पूर्वतयारीसह आवश्यक खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले. आरोग्य तपासणी केंद्रे, औषध साठा, वैद्यकीय पथकांची उपलब्धता आणि आपत्कालीन सेवा तत्पर ठेवण्यावर भर द्यावा, असे देखील संगमनेरे यांनी सांगितले. पुढील टप्प्यात संत निवृत्तिनाथ संस्थान, पालखी सोहळ्याच्या मार्गावरील ग्रामपंचायती, कार्यालयीन यंत्रणांची एक संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत पालखी मार्गावरील गावांमध्ये समन्वयाने कार्यवाही सुनिश्चित करण्यात येईल. त्याचबरोबर, त्र्यंबकेश्वर, नाशिक व सिन्नर तालुक्यांतील गटविकास अधिकाऱ्यांना तालुकास्तरीय यंत्रणांची स्वतंत्र बैठक घेऊन आवश्यक तयारी करण्याचे निर्देश देखील संगमनेरे यांनी दिले.

क्रेडाई नाशिक मेट्रोचा स्थापना दिवस



नाशिक । प्रतिनिधी

देशातील बांधकाम व्यावसायिकांची सर्वात मोठी संस्था क्रेडाई नाशिक मेट्रोचा ३८ वा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

बांधकाम व्यावसायिकांची संस्था ते नाशिक ब्रॅन्डींग, रोजगार निर्मिती व सामाजिक भान असणारी संस्था असा प्रवास बघतांना अत्यानंद होत असल्याचा सूर क्रेडाई नाशिक मेट्रोच्या सर्व माजी अध्यक्षांनी काढला. आज संस्था सर्वोच्च स्थानी असण्यामागे सर्व माजी अध्यक्ष व तत्कालीन पदाधिकाऱ्यांचे मोलाचे योगदान असल्याचे अध्यक्ष गौरव ठक्कर यांनी सांगितले. सुरुवातीच्या काळात बांधकाम व्यावसायिकांना एकत्र आणणाऱ्या या संस्थेचा आवाका हा विविध कार्यांनी आज खूप मोठा झाला आहे.नाशिक हे आज देशपातळीवर काम करणाऱ्या क्रेडाईचे उगमस्थान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

गेल्या ३८ वर्षात क्रेडाईने गृहनिर्माणासोबतच शहराचे ब्रॅन्डींग ,शहर विकास आराखडयात योगदान,रेरा व युनिफाईड डीसीपीआरची अंमलबजावणी , सदस्यांसाठी नियमित प्रशिक्षण ,विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम हाती घेतले आहेत. बांधकाम उद्योगाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक करण्यामागे क्रेडाईची मोलाची भूमिका असल्याचेही ठक्कर यांनी सांगितले. कार्यक्रमामध्ये सर्व माजी अध्यक्षांचा सन्मान करण्यात आला. यासोबतच माजी अध्यक्ष दिवंगत सदुभाऊ शुक्ल यांचे स्मरण करण्यात आले. क्रेडाई नाशिक मेट्रोची सदस्यसंख्या ५०० हून अधिक असून युवा विंग, महिला विंग कार्यरत असल्याचे मानद सचिव तुषार संकलेचा यांनी सांगितले. तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात उपाध्यक्ष उदय घुगे यांच्या भाषणाने झाली. शेवटी हंसराज देशमुख यांनी आभार मानले. यावेळी क्रेडाई सदस्य सहपरिवार उपस्थित होते.

साहित्य संमेलने आवश्यक : डॉ. कराळे

महाराष्ट्र पोलीस साहित्य संमेलनाचा समारोप

नाशिक । प्रतिनिधी

पोलीस कर्तव्य बजावतांना प्रकृती उत्तम ठेवण्याचे कर्तव्य विसरतात. त्यामुळे त्यांनी तणावमुक्त जीवन जगावे. तणावमुक्तीसाठी व नवऊर्जा मिळावी, यासाठी पोलिसांसाठी साहित्य संमेलन गरजेचे आहे, असे प्रतिपादन नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी केले. महाराष्ट्र पोलीस साहित्य संमेलनाच्या समारोपाप्रसंगी त्यांनी मार्गदर्शन केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रांगणात आयोजित द्विदिवसीय महाराष्ट्र पोलीसस साहित्य संमेलनाचा रविवारी समारोप झाला. स्वप्नील डोंगरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर केला. सूत्रसंचालन अभय पै, डॉ. राजेंद्र राठोड व जयश्री वाघ यांनी केले. संमेलन यशस्वीतेसाठी संजय कर्जकर, प्रा. सोमनाथ मुठाळ, डॉ. सीताराम कोल्हे, जी. पी. खैरनार, किरण सोनार आदींनी परिश्रम घेतले. सकाळच्या सत्रात कवी संमेलन पार पडले. यात सहभागी कवींनी रचना सादर केल्या. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, स्वागताध्यक्ष बी. जी. शेखर पाटील, शिरीष सहस्त्रबुद्धे, डॉ. कैलास कमोद यांनी मनोगत व्यक्त केले.

संमेलनात मंजूर ठराव...

* पुढील साहित्य संमेलन पुणे येथे घेण्यात यावे.
* पोलीस साहित्य संमेलनासाठी शासकीय तरतूद व्हावी.
* संमेलनासाठी उपस्थित राहणाऱ्या साहित्यिकांना किमान तीन दिवस विशेष पगारी रजा मंजूर करावी.
* पोलीस अधिकाऱ्यांसोबत त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी यांचा समावेश व्हावा.
* विविध कला गुण सादर करणारे कलाकार, अभिनेते, गायक यांना विशेष शासकीय सवलत द्यावी.

'पाठारे प्रभू' फूड फेस्टिव्हल समृद्ध खाद्य संस्कृतीची सातशे वर्षांची परंपरा

नाशिक । प्रतिनिधी

मराठी, गुजराती आणि मारवाडी अशा तिन्ही संस्कृतीचा संगम असलेल्या आणि तब्बल ७०० वर्षांची समृद्ध खाद्य संस्कृतीची परंपरा लाभलेल्या 'पाठारे प्रभू' फूड फेस्टिव्हलमध्ये नाशिककर खवय्यांना अनोख्या पदार्थांची चव चाखण्याची संधी आता उपलब्ध झाली आहे.

हॉटेल एक्सप्रेस इन येथे १ जून पर्यंत 'पाठारे प्रभू' फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध पाककला तज्ज्ञ शेफ बिंबा नायक यांनी तयार केलेल्या व्हेज व नॉनव्हेज अशा दोन्हीही प्रकारामधील अनोख्या खाद्यपदार्थांची मेजवानी या फेस्टिव्हलमध्ये खवय्यांसाठी उपलब्ध असतील. फूड फेस्टिव्हलचे आयोजन शेफ बिंबा नायक, शेफ गौरी नायक, शेफ प्रताप चहर, जनरल मॅनेजर संजय कुमार रामानंद, पीआर मॅनेजर केविन संचेती ,कुणाल बाजपेयी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. यावेळी प्रणव बेश्य, इस्माईल शेख, नंदकिशोर गायकवाड, राजेश शिरसाठ, दिनेश संसारे आदि उपस्थित होते.

चटणीचा सारंगा, बोंबिल कटलेट्स, भरलेली चिंबोरी, मटन सुखे, कोळंबीची खिचडी, कोळंबी खडखडले, हलवा सोलचे, अननस सांभारे, जवळ्याच्या वड्या, वांगी पंचामृत, भेंडे वाटणे भाजी, सागू खीर, दुधी बटाटा गोडे, वाडीचे भुजणे, उकडीचे मोदक, कोनफळ पॅटीस यांसह इतर अनेक पदार्थांचा फेस्टिव्हल मध्ये समावेश आहे.

ग्राहक सेवा सर्वत्र पोहोचवणार : पवार

एसईए संघटनेकडून नाशकात गौरव समारंभ

नाशिकरोड । प्रतिनिधी

पुणे परिमंडळ येथे मुख्य अभियंता पदावर कार्य करताना कंपनीमध्ये पहिल्यांदाच जे ग्राहक सेवेसंदर्भातील नावीन्यपूर्ण अभिनव उपक्रम राबविले, ते संपूर्ण ग्राहक सेवेचे कार्य 'नाते प्रकाशाचे' या योजनेचा माझ्या पुस्तिकेच्या माध्यमातून लवकरच सर्वांपर्यंत पोहचविणार असून, हे पुस्तक अभियंते व कर्मचाऱ्यांसाठी दीपस्तंभ ठरेल, असे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले.

ते नाशिक येथे सभागृहात सबॉर्डिनेट इंजिनियर असोसिएशन, नाशिक व मालेगाव मंडळ यांच्या वतीने आयोजित गौरव सोहळ्यात आभार व्यक्त करताना करताना बोलत होते.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा एसईएचे केंद्रीय अध्यक्ष लक्ष्मण राठोड, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, मुख्य अभियंता (वितरण) अंकुर कावळे, एसईएचे सरचिटणीस संतोष खुमकर, एसईएचे पदाधिकारी किरण जाधव, श्रीनिवास बोबडे, संजय ठाकूर व नारायण चकोर उपस्थित होते.

मूळचे नाशिककर असलेले आणि नाशिकमध्ये अनेक वर्षे महावितरणमध्ये सेवा दिल्यानंतर नुकतेच महावितरणमधील उच्चपदावर विराजमान झालयाबद्दल मानव संसाधन विभागाचे संचालक राजेंद्र पवार आणि मुख्य अभियंता (वितरण) अंकुर कावळे यांचा सबओर्डिनेट इंजिनियर असोसिएशनतर्फे नाशिक येथे आयोजित सत्कार सोहळ्यात सन्मान करण्यात आला.

यावेळी राजेंद्र पवार म्हणाले की, पुणे परिमंडळात सर्वांना सोबत घेऊन विविध कार्य केले असून, विविध योजना व प्रकल्पांच्या माध्यमातून सौर क्षमता वाढविली. अनेक योजना आणि सेवांमध्ये ग्राहक जनजागृती सोबतच प्रचंड सुधारणा करीत पुणे परिमंडळाला सर्वोच्च स्थानी पोहचविले. मुख्य अभियंता अंकुर कावळे त्यांनी सुद्धा गौरव केल्याबद्दल आभार व्यक्त करीत आणखी उत्कृष्ट काम करण्याची ग्वाही दिली.

सोहळ्याच्या सुरुवातीला मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांच्या प्रतिमेला संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. अभियंते राजेंद्र भांबर, किरण घनाईत व एस. पी. अहिरे यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. गौरव सोहळ्याचे प्रास्ताविक संघटनेचे सहसचिव विशाल मोरे यांनी तर संचालन वीणा दिघे यांनी आणि आभार संघटनेचे सहसचिव राहुल महाले यांनी मानले.

ललित रुंगटा ग्रुपचा 'रुंगटा अशोक विहार' प्रकल्प

ग्राहकांना मोठ्या बचतीची संधी

नाशिक । बांधकाम क्षेत्रात २८ वर्षांपासून गुणवत्ता आणि विश्वासाचे प्रतीक असलेल्या ललित रुंगटा ग्रुपने, शहरवासीयांसाठी एक अभूतपूर्व संधी आणली आहे. नाशिकमधील प्रतिष्ठित आणि मागणीच्या असलेल्या सिटी सेंटर मॉल परिसरात असलेल्या 'रुंगटा अशोक विहार' या निवासी प्रकल्पावर आता बुकिंग करणाऱ्यांना थेट ११ लाख रुपयांपर्यंत बचतीची संधी मिळणार आहे.

'रुंगटा अशोक विहार' हा प्रकल्प नाशिकच्या मध्यवर्ती आणि गजबजलेल्या सिटी सेंटर मॉल परिसरात वसलेला आहे. टॉप ब्रँड्सची उपस्थिती, उत्कृष्ट रेस्टॉरंट्स, मनोरंजनाची ठिकाणे, सहज उपलब्ध सार्वजनिक वाहतूक, विकसित किरकोळ आणि व्यावसायिक बाजारपेठा, तसेच नामांकित शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालये यांच्या सान्निध्यात असल्यामुळे शहराच्या प्राइम लोकेशनवर हा प्रभाग गणला जातो. आधुनिक जीवनाच्या सर्व गरजा आणि सोयी येथे हाकेच्या अंतरावर आहेत.

प्रत्येकाला घरामध्ये शांतता आणि प्रायव्हसीची गरज असते. 'रुंगटा अशोक विहार'मधील प्रशस्त आणि आलिशान ३ बीएचकेघरे याच विचारातून डिझाइन करण्यात आली आहेत. येथे प्रत्येक मजल्यावर केवळ दोनच घरे असल्यामुळे येथे शांतता आणि प्रायव्हसी अनुभवता येते. ही घरे केवळ आकाराने मोठी नाहीत, तर त्यांचे डिझाइन आणि रचनाही प्रशस्त आहे. ललित रुंगटा ग्रुप नेहमीच त्यांच्या प्रकल्पांमध्ये उत्कृष्ट बांधकाम, अभिनव डिझाइन आणि अभेद्य गुणवत्तेसाठी कटिबद्ध राहिले आहेत. 'रुंगटा अशोक विहार' हा प्रकल्प त्यांच्या याच परंपरेचा एक उत्कृष्ट नमुना आहे, जिथे प्रत्येक पैलूमध्ये उच्च दर्जाची खात्री दिली जाते. नाशिकमधील सर्वोत्तम ठिकाणी, सर्वोच्च दर्जाचे जीवन जगण्याची आणि त्याच वेळी आपल्या गुंतवणुकीवर मोठी बचत करण्याची ही एक दुर्मिळ संधी असल्याने नाशिककरांनी याचा नक्की फायदा घ्यावा असे आवाहन संचालकांनी केले आहे.

शिवाजीनगरात खून

दोघांकडून जबर मारहाण झाल्याचे सीसीटिव्हीत कैद

नाशिक । गंगापूर रोडवरील शिवाजीनगर परिसरात २३ वर्षीय युवकाची दोघा संशयितांनी अनैतिक संबंधाच्या वादातून जबर मारहाण करून हत्या केल्याचे उघड झाले आहे. नसीम शहा असे खून झालेल्या संशयिताचे नाव असून गंगापूर पोलिसांनी दोघा संशयितांची नावे निष्पन्न करून त्यांचा शोध सुरु केला आहे.

ध्रुवनगरजवळील शिवाजीनगर परिसरात सोमवारी (दि. २६) सायंकाळी एका तेवीस वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आला. या युवकास इतर दोघांनी मारहाण केल्याचे एका सीसीटीव्हीत दिसून आले. त्यानुसार, पोलिसांनी तपास केला असता, दोघा संशयितांनी मारहाण करुन हत्या केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी गंगापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

हरीष लोढा, सुभाष नहार यांची निवड

नाशिक । नामको बँकेचे विद्यमान संचालक हरीष लोढा यांची ऑल इंडिया स्थानकवासी जैन कॉन्फरन्स मानवसेवा योजना, चतुर्थ झोन, महाराष्ट्र प्रांताचे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. तर नामको बँक उपाध्यक्ष सुभाष नहार यांची सेक्रेटरीपदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश भटेवरा, राष्ट्रीय मंत्री जिंतेंद्र चोपडा नामको बँकेचे सर्वेसर्वा सोहनलाल भंडारी, प्रांतीय अध्यक्ष मोहनलाल लोढा यांनी विशेष पुढाकार घेऊन लोढा व नहार यांच्या सेवाभावी कार्याची दखल घेऊन ही निवड केली. लोढा नामको बँक व जैन बोर्डिंगचे माजी अध्यक्ष, लोकनेते दिवंगत बाबुलाल लोढा यांचे चिरंजीव आहे. हरीष लोढा हे नामको बँकेचे माजी उपाध्यक्ष व विद्यमान संचालक आहेत. जैन ओसवाल बोर्डींगचे माजी अध्यक्ष जैन संघटना केवडीवन स्थानक आदी विविध संस्थेवर कार्यरत आहेत. त्यांचा १० वर्षापासून एच.बी. लोढा या नावाचा ग्रुप आहे. त्यात २०० युवकांचा सहभाग असुन हा ग्रुप विविध सामाजिक उपक्रमांसाठी प्रसिध्द आहे. सुभाष नहार बँकेचे विद्यमान उपाध्यक्ष आहेत.

विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करा

इंदिरानगर । वार्ताहर

पाथर्डी फाटा चौफुली सिग्नल जवळ बॅरिकेट्स लावलेले असताना ही विरुद्ध दिशेने वाहनचालक वाहने चालवतात. त्यामुळे या ठिकाणी वाहनचालकांमध्ये हाणामारीचे प्रकार घडत आहे. याबाबत विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करावी, अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे.

पाथर्डी फाटा येथे मॅकडॉनल्ड्स हॉटेलसमोर नाशिककडे जात असलेल्या रस्त्यावर बॅरिकेट्स टाकलेले आहे. या बॅरिकेटच्या विरुद्ध दिशेने वाहनचालक वाहन चालवतात. त्यामुळे वाहतूक ठप्प होत असते. या वाहनचालकांना शिस्त लावण्यासाठी कायमस्वरूपी वाहतूक पोलीस येथे उभे असणे गरजेचे आहे. तसेच अरुंद रस्त्याजवळ सूचना फलक किंवा बॅरिकेट्स दुभाजक टाकण्यात यावे, अशी मागणी सागर शेलार, किरण भुसारे, राजेश जगताप, विजय विधाते, एकनाथ नवले, गणेश जाधव, जितेंद्र चोरडिया आदींनी केली आहे.

मनपा आयुक्त पुन्हा परदेशी; अतिरिक्त आयुक्तांकडे पदभार

नाशिक - प्रतिनिधी

नाशिक महापालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री पुन्हा परदेश दौऱ्यावर गेल्या आहेत. त्यामुळे दोन जूनपर्यंत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांच्याकडे आयुक्त पदाचा चार्ज राहणार आहे.



ब्राझील येथील एका संस्थेच्या माध्यमातून खत्री यांना आमंत्रित करण्यात आल्याचे समजते. त्यामुळे खत्री यांनी केंद्र तसेच राज्य शासनाची परवानगी मागितली होती. शासनाने परवानगी दिल्यानंतर त्या ब्राझीलला रवाना झाल्याची माहिती मिळाली आहे.

पावसाचा हाहाकार

(पान १ वरून) वाढली आहे. मुंबईत मान्सून सहसा ११ जूनला येतो, पण यंदा तो तब्बल १६ दिवस आधीच, म्हणजे २६ मे रोजी दाखल झाला. यापूर्वी १९५६, १९६२ आणि १९७१ मध्येच मुंबईत मे महिन्यात मान्सून आल्याची नोंद आहे. मुंबई आणि उपनगरात सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे लोकल सेवा आणि वाहतुकीवर परिणाम झाला असून, काही रेल्वे मार्गांवर अडथळे निर्माण झाले आहेत. हवामान विभागाने राज्याच्या विविध भागांसाठी सतर्कतेचा इशारा दिला आहे. आज ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, पुण्याच्या व साताऱ्याच्या घाट परिसरात विजा आणि मेघगर्जनेसह अतिजोरदार पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे शहर वगळता पुणे जिल्हा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, बीड,लातूर व धाराशिव या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पुणे शहरासाठी पुढील चार दिवस

येलो अलर्ट असेल. मुंबईतही पुढील चार दिवसांसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट असणार आहे.रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांनाही अतिजोरदार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पुढील ५ दिवस काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाडा आणि विदर्भातही काही ठिकाणी पावसाचा जोर कायम राहील.

सिंदूर पुसणाऱ्यांचा बदला निश्चित

(पान १ वरून) १४० कोटी भारतीयांना आव्हान दिले होते. म्हणूनच मोदींने तेच केले, ज्यासाठी देशवासीयांनी त्याला प्रधानसेवकाची जबाबदारी दिली.मोदी पुढे म्हणाले, मोदीशी पंगा घेणे एवढे महागात पडू शकते, असा विचार कधी स्वप्नातही दहशत पसरवणाऱ्यांनी केला नसेल. त्यांनी २२ तारखेला जो खेळ खेळला होता, तो आम्ही हाणून पाडला. आमच्या सैन्याने पाकिस्तानी सैन्याला पार धूळ चारली. आम्ही देशाच्या सैन्याच्या शौर्याला सॅल्यूट करतो. देशाच्या प्रगतीसाठी जे काही आवश्यक आहे, ते आपण भारतातच बनवले पाहिजे, ही काळाची गरज आहे. आज आपण खेळण्यांपासून ते लष्करी शस्त्रांपर्यंत सर्व काही जगभरातील देशांमध्ये निर्यात करत आहोत. आज भारत रेल्वे, मेट्रो आणि त्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान बनवतो आणि जगाला निर्यातही करतो. नुकताच हजारो कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. काही लोकांना शिव्या देण्याची सवयच लागली आहे. ते म्हणायचे की निवडणुका आल्या, मोदीजींनी पायाभरणी केली, काहीही होणार नाही. आज, तीन वर्षांनंतर, या कारखान्यात पहिले इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह बनून तयार झाले आहे. आज त्याला हिरवा झेंडा दाखवण्यात आला, असेही मोदी म्हणाले. मोदी पुढे म्हणाले, पाकिस्तानातून दहशतवाद संपविण्यासाठी तेथील नागरिकांना पुढे यावे लागेल. तरूणांना पुढाकार घ्यावा लागेल. तुम्ही सुखाने जगा, भाकर खा नाहीतर माझी गोळी आहेच.आमची मोहीम फक्त सूड घेण्यापूरती मर्यादीत नव्हती. तर माणुसकीला वाचविणे आणि दहशतवाद संपविण्याचा आमचा प्रयत्न होता. पहलगामच्या हल्ल्यानंतर आम्ही १५ दिवस वाट पाहिली. आम्हाला वाटले पाकिस्तान दहशतवादाच्या विरोधात भूमिका घेईल. पण दहशतवादच त्यांचा अविभाज्य भाग असल्याचे दिसून आले.

सुनांना छळणाऱ्या कुटुंबीयांवर बहिष्कार

(पान १ वरून) करणे हे उरवण्यात आले आहे. तसेच, ज्या कुटुंबांमध्ये मुलींचा छळ होईल, त्यांच्याशी मरोटी-बेटीपत्रा व्यवहार बंद करण्याचा ठराव देखील यावेळी झाला. चेतन तुपे यांनी सांगितले की, वैष्णवीप्रमाणे जर कोणत्याही मुलीवर हुंड्यासाठी छळ झाला तर त्या प्रवृत्तीवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात येईल. समाजात स्पष्ट संदेश जाईल की अशा प्रकारचे वर्तन सहन केले जाणार नाही.

आजचे कार्यक्रम

वसंत व्याख्यानमाला

* स्व. श्रीमती निर्मला केशव गरड स्मृती व्याख्यान

वक्ते :- श्रीनिवास ठाणेदार कॉंग्रेसमन, (खासदार) मिशिगन, अमेरिका

विषय : प्रकट मुलाखत : मुलाखतकार पत्रकार सुरेश भटेवरा आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन इटकर

* गोल्डन व्हॉईस प्रस्तुत : रफी के रंग-अजय बाहेती, वैष्णवी पगारे

*एआयएसएफ नाशिकतर्फे हेमू कलानी विद्यार्थी सन्मान सोहळा

संध्याकाळी ५ वाजता, औरंगाबादकर सभागृह, टिळकपथ, नाशिक, प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. एस. के. शिंदे